# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/११/१७
## दि.०४/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६२३/१७,भादविक ३०७,५०६,३४ |
| **फिर्यादी** | शिवकुमार पलकोंडे,वय-३० वर्ष, रा.शिवणेकर चाळ,रहाटणी,पुणे |
| **आरोपी** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/११/२०१७ रोजी १६/३० वा.विक्रांत वाईन्स जवळ,पान टपरी समोरील रोडवर, रहाटणी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मावस मेव्हणा तनिल गजलवाड असे त्यांचा टेम्पो पार्क करुन गप्पा मारत उभे असताना,यातील नमुद इसमांनी मोटार सायकल व रिक्षा मधुन सदर ठिकाणी येऊन त्यांचे पाठीमागील बाजुस लपविलेला कोयता काढुन फिर्यादीस "तु मला बिअरचा बॉक्स का दिला नाहीस,आता तुला मी सोडणार नाही,तुला खल्लास करतो" असे म्हणुन त्याने लोखंडी कोयत्याने फियादीचे डोक्यात व डावे पायाचे मांडीचेवर वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच रस्त्यावरील दगड उचलुन फिर्यादीचे डावे खांदयावर व डावे हातावर मारले. त्यावेळी फिर्यादी यांचा मेव्हणा तनिल गजलवाड हा फिर्यादी यांना वाचविण्यासाठी मध्ये येत असताना सदी इसमांनी त्यांचे हातातील लोखंडी कोयते हवेत फिरवुन,तु मध्ये आलास तर तुलाही मारुन टाकील अशी धमकी देऊन,सदर ठिकाणी दहशत निर्माण करुन मोटार सायकल व रिक्षामध्ये बसुन निघुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, ए.एम.जाधव ९५२७००२८४५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे २१०/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.उप.निरी. शेंडगे, दिघी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | संजीव नंदकिशोर शर्मा,वय-४४,रा.चंदननगर वडगांव-शेरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/११/१७ रोजी ०८/४५ वा. डुडुळगांव,आळंदी मोशी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक महिला पादचारी सत्यभामा हनुमंत मुरकुट,वय-७९,रा.डुडुळगांव,पुणे हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घिगे ९०७५०९८५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ६२७/१७,भादविक ४९८(अ),३०६,३२३,३४ |
| **फिर्यादी** | रामनरेश प्रसाद,वय-५८,रा.राज्य बिहार |
| **आरोपी** | १.राजेश ब्रिजेश सिंग,वय-३४ वर्षे व इतर एक पुरूष व तीन महिला,सर्व रा.घर नं. ३९८/२१४०, संत तुकाराम नगर पिंपरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/११/२०१७ रोजी रात्रौ २२/४५ वा.घर नं.३९८/२१४०,संत तुकाराम नगर,पिंपरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.संगीता राजेश सिंग,वय-३० वर्षे,रा.सदर हि तीचे सासरी पिंपरी,पुणे येथे नांदत असताना,तीने माहेरहुन नवीन चारचाकी गाडी घेण्यासाठी ५ लाख रुपये घेवुन यावे यासाठी तीचा पती राजेश ब्रिजेश सिंग इतरांनी तीस वेळोवेळी हाताने मारहाण करुन,उपाशी पोटी ठेवुन,तीचा शरिरीक व मानसिक छळ करून,सौ.संगीता हिने दि.०३/११/२०१७ रोजी रात्रौ २२/४५ वा. राहते घराचे चौथ्या मजल्यावरील टेरेसवरुन खाली उडी मारुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. कडाळे ९५२७४६२३०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २४०/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | सौ.रुपाली मरळ,वय-३९,रा.१८८ शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी महिला वय अंदाजे ३५ ते ३८ वर्षे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/१०/१७ रोजी ०८/४५ ते ०९/१५ वा.चे दरम्यान तसेच दि.१८/१०/१७ रोजी १७/०० ते १७/३० वा.चे दरम्यान चंदुकाका सराफ ॲण्ड सन्स प्रा.लिमी. ४३९,रविवार पेठ,पुणे या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया चंदुकाका सराफ ॲण्ड सन्स प्रा.लिमी. ४३९,रविवार पेठ,पुणे या दुकानात पुष्कराज रत्न व दोन चांदीचे पैंजण तसेच चांदीचा कडा असा एकुण १,११,८७०/- रू किचा ऐवज सोने खरेदीसाठी गि-हाईक म्हणुन आलेल्या यातील नमुद अनोळखी महिला यांना दाखवित असताना,सदर महिलांनी फिर्यादी यांची नजर चुकवुन सदरचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.बी.कदम ९८६०५३१६५३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४४३/१७,भादविक ४२०,४६४,४६५,४६८,३४ |
| **फिर्यादी** | झैनुला जहाँगिर,वय-६१,रा.४३९,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | हसनअली व इतर दोन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१५ ते आजपावेतो टेंम्पल टॉवरचे बाजुला कोंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद हसनअली व इतर दोन यांनी फिर्यादी यांना टेंम्पल टॉवरचे बाजुला कोंढवा,पुणे येथे याठिकाणी चालु असलेले बांधकाम दाखवुन,बिल्डींग स्वतःचे मालकीची नसताना देखील स्वतःची असल्याचे भासवुन,फिर्यादीस बिल्डींग मधील दोन फ्लॅट विकत देण्याचे सांगुन, त्यापोटी फिर्यादी यांचेकडुन २५ लाख रुपये घेऊन,फिर्यादीस बनावट पावत्या देऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कुल्लाळ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**